नि.दि.दावा क्र.१८१/२०१८.
बँक ऑफ इंडिया विरुध्द
जयवंत थोरात व इतर.

## निशाणी क्र.१७ कडील आदेश

प्रतिवादी क्र.२ ने सदरच्या अर्जाद्वारे त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश रद्द करण्याची विनंती केली आहे.

२. अर्ज वाचला. अर्जातील कथनांप्रमाणे, प्रतिवादी क्र.२ यांना सर्व माहिती मिळविणे, कागदपत्रांची जुळवाजुळव करणे, वकीलांची नेमणूक करणे यासाठी बराचसा कालावधी गेला असल्यामुळे दाव्यास मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. सबब त्याचेविरुध्द दावा विनाकैफियत चालविण्याचा हुकुम झालेला आहे. वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्याच्या दृष्टीने व उभय पक्षातील वाद विषय कायमस्वरुपी संपुष्टात येणेसाठी या प्रतिवादी क्र.२ ची कैफियत दाखल करुन घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादीने हरकत घेतली असुन पुरेसा कालावधी मिळूनही दाव्याचे काम लांबवणेचे हेतूने कैफियत उशिराने दाखल केली आहे असे म्हटले आहे. सबब, त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली आहे.

४. अभिलेख पडताळला.

५. प्रस्तुतचा दावा हा रक्कम वसूलीकरीत केलेला आहे. प्रतिवादींनी दि. ०८/०८/२०१८ रोजी हजर होवूनही दाव्यास मुदतीत कैफियत दिलेली नाही. परंतू या प्रतिवादीं विरूध्द विना कैफियत दावा चालविण्याचा आदेश झालेला दिसून येत नाही. तथापि या प्रतिवादींनी मुदतीत कैफियत दिलेली नाही हे दुर्लक्षित करता येणार नाही. अर्जात नमूद कारणे पाहता, दाव्यामध्ये तांत्रिक अडचण राहु नये म्हणुन व या प्रतिवादी क्र.२ यास त्याचा योग्य तो बचाव मांडता यावा याकरिता पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. दाव्याचा गुणावगुणांवर निर्णय होण्याकरिता या प्रतिवादी क्र.२ ची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. तथापि कैफियत दाखल करण्यास या प्रतिवादी क्र.२ कडून झालेला उशिर विचारात घेऊन त्याचेवर योग्य तो खर्च बसविणे न्यायोचित होईल.

६. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परंतु झालेला विलंब पाहता, प्रतिवादी क्र.२ यांचेवर रक्कम रु.५००/— इतका

खर्च बसविणे न्यायोचित होईल. सबब मी पुढील आदेश पारीत करित आहे.

**: <u>आदेश</u> :**

१. अर्ज (नि.१७) रु.५००/— इतक्या खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाची रक्कम या प्रतिवादी क्र.२ ने वादीस पुढील तारखेपर्यंत देण्याची आहे.

Digitally signed by Aarti Arunkumar Kulkarni
Date: 2020.10.23 12:59:59 +0530

दिनांक :— २९/०९/२०२०.
कराड.

(आरती कुलकर्णी)
५ वे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कराड.